
ISSN : 2231 4377
(Peer Reviewed Journal)

SAKSHAM SAMIKSHA त्रैमासिक
# सक्षम समीक्षा
मराठी भाषा-वाङ्मय व संशोधन यासाठी असलेला मंच
संपादक : प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन

न्याली प्रकाशन पुणे-५८.

वर्ष : १४ वे अंक : ५६ वा
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२५ (अंक चौथा)

# डॉ. राजा दीक्षित साहित्य विशेषांक



બ્રાહ્મણ નાહી, હિંદુહિ નાહીં, ન મી એક પંથાચા,
તેચ પતિત કીં જે આંખડિતી પ્રદેશ સાકલ્યાચા!
ખાદાડ અસે માઝી ભૂક,
ચતકોરાનેં મલા ન સુખ;
કૂપાંતિલ મી નચ મંડૂક;
મળ્યાંસ માઝ્યા કુંપણ પડણે અગદીં ન મલા સાહે!

- કવી કેશવસુત ('નવા શિપાઈ', ૮ માર્ચ ૧૮૮૮)

Library 27/8/2025

वितरण क्षेत्र : * राज्य : पश्चिम बंगाल (कलकत्ता), उत्तर प्रदेश (वाराणसी), कर्नाटक, गोवा, गुजरात (बडोदा), तेलंगणा (हैद्राबाद) गुरूग्राम (हरियाणा)
* जिल्हा : पुणे, अहमदनगर, नाशिक, मुंबई, ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, यवतमाळ, लातूर, परभणी, जालना, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, नांदेड, जळगांव, धुळे, नंदूरबार, चंद्रपूर, गडचिरोली, वाशिम

Scanned with OKEN Scanner

शब्दाली प्रकाशन पुणे-५८.

■ एसडीएम/पुणे/एसआर/६१/९/४/२०१३ ■ आयएसएसएन : २२३१-४३७७

SAKSHAM SAMIKSHA त्रैमासिक

# सक्षम समीक्षा

मराठी भाषा-वाङ्मय व संशोधन यासाठी असलेला मंच

■ वर्ष : १४ वे ■ अंक : ५६ वा

■ जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२५ (अंक चौथा)

■ संपादक :

**प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन**

(एम.ए., एम.फिल., पीएच.डी. - मराठी, नेट)

■ **प्रकाशक, मालक, मुद्रक :**

सुनिता शैलेश त्रिभुवन (एम.ए. - मराठी)

■ **पत्र व्यवहारचा पत्ता : शब्दाली प्रकाशन**

बी-५/२०६/दुसरा मजला, राहुलनिसर्ग, अतुलनगर, वारजे, पुणे - ४११ ०५८.

■ **मो. :** ९९२२१ ३०१५७

■ **Email :** dr.shailesh.tribhuwan@gmail.com

■ **टाईपसेटिंग :** गणेश ग्राफिक्स, पुणे.

■ **मुद्रक :** गणेश ग्राफिक्स, पुणे. मो. ९०११७७३३२२

■ **मुखपृष्ठ :** संपादक

■ **मुद्रित शोधन :** संपादक

■ **वर्गणी :** वार्षिक: व्यक्ती: रु. ५००/- संस्था : रु.५००/-

त्रैवार्षिक : व्यक्ती: रु. १,२००/- संस्था : रु.१,२००/-

दहा वर्षे : व्यक्ती: रु.५,०००/- संस्था: रु.५,०००/-

■ लेख : ७०८ श्रीलिपी व ओपन फाईलमध्ये पाठवावेत.

■ **वार्षिक व पंचवार्षिक वर्गणी :** आपल्या स्थानिक बँकेत -

■ **बँक ऑफ महाराष्ट्र, कर्वेनगर, पुणे.**

**(IFCS Code - MAHB 00 00 970)**

**'शब्दाली प्रकाशन' पुणे. (खाते क्र. : 60058138435)**

या खात्यावर जमा करून पावती शब्दाली प्रकाशनाच्या पत्त्यावर पाठवावी.

■ **Google Pay & Phone Pay No.: ९९२२१ ३०१५७**

(Google Pay & Phone Pay ने वर्गणी पाठवल्यास Phone Screenshot व पत्ता What'sup वर पाठवणे)

■ **सल्लागार मंडळ (Adviser Committee)**

| | | |
|---|---|---|
| डॉ. रावसाहेब कसबे | (नासिक) | - दूरभाष: ९८५०५४७५७८ |
| डॉ. यशवंत मनोहर | (नागपूर) | - दूरभाष: ८००७१५५५७७ |
| प्रा. दत्ता भगत | (औरंगाबाद) | - दूरभाष: ९८८१२३००८४ |
| प्रा. उत्तम कांबळे | (नासिक) | - दूरभाष: ९८८१०९११४३ |
| प्रा. डॉ. आनंद पाटील | (कोल्हापूर) | - दूरभाष: ९४०४१४०९९५ |

■ **परीक्षण समिती (Review Committee)**

| | | |
|---|---|---|
| प्रा. डॉ. संजय करंदीकर | (गुजरात) | - दूरभाष: ९९०९९१६९७८ |
| प्रा. डॉ. वंदना महाजन | (मुंबई) | - दूरभाष: ९४२१५६८३४५ |
| प्रा. डॉ. सुधाकर शेलार | (अ.नगर) | - दूरभाष: ९८९०९१३२३६ |
| प्रा. डॉ. शैलेंद्र लेंडे | (नागपूर) | - दूरभाष: ८१४९३१२१३४ |
| प्रा. डॉ. प्रभाकर देसाई | (पुणे) | - दूरभाष: ९८८१९०८०२० |
| प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर | (नांदेड) | - दूरभाष: ७५८८४१२१५३ |

■ **संपादक मंडळ (Editor Committee)**

| | | |
|---|---|---|
| प्रा. डॉ. सुमेध रणवीर | (प. बंगाल) | - दूरभाष: ७५८५९५०३६५ |
| प्रा. डॉ. तेजस चव्हाण | (दिल्ली) | - दूरभाष: ७३८५५८८३३५ |
| प्रा. डॉ. संजय कांबळे | (कर्नाटक) | - दूरभाष: ९१६४३५८४८९ |
| प्रा. डॉ. ताहेर पठाण | (उ. प्रदेश) | - दूरभाष: ९९२२०२६६९८ |
| प्रा. डॉ. विनय मडगावकर | (गोवा) | - दूरभाष: ८३०८४७७६६४ |
| प्रा. डॉ. व्ही.एन. इंगोले | (हरियाना) | - दूरभाष: ९४२२८७१३२१ |
| प्रा. डॉ. नम्रता बागडे | (तेलंगणा) | - दूरभाष: ८८०१९६६९२० |
| प्रा. डॉ. तुषार चांदवडकर | (नासिक) | - दूरभाष: ९४२२९४३६५२ |
| प्रा. डॉ. सारिपुत्र तुपेरे | (सोलापूर) | - दूरभाष: ९८२२९८४३१३ |
| प्रा. डॉ. सुभाष आहेर | (सातारा) | - दूरभाष: ९८५०२०९३७२ |
| प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे | (कोल्हापूर) | - दूरभाष: ९४२०६३८८४० |
| प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे | (रत्नागिरी) | - दूरभाष: ९९२१८४६१९८ |
| प्रा. डॉ. नवनाथ गोरे | (औरंगाबाद) | - दूरभाष: ९४२३१८१९५७ |

■ ***या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी सल्लागार मंडळ, परीक्षण समिती, संपादक मंडळ, मालक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.***

■ ***या त्रैमासिकात लेख, शोधनिबंध, कविता छापण्यासाठी कोणतीही रक्कम स्वीकारली जात नाही. परंतु सभासदत्व अनिवार्य आहे.***

■ **महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.**

■ **या अंकातील लेख करारबद्ध असून इतरत्र पूर्व परवानगी शिवाय छापता येणार नाहीत. (संपादक)**

■ **ऑनलाईन वर्गणीदार होण्यासाठी पान नंबर ९५ वर QR कोड दिलेला आहे. कृपया पहा.**



Scanned with OKEN Scanner

# अं | त | रं | ग


| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | प्रा. राजा दीक्षित यांची मुलाखत | प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन (पुणे) ...... | ७४ |
| ०२. | कवितेचा चिरंतन लंपडाव | प्रा. डॉ. सदानंद मोरे (पुणे) .................. | ०४ |
| ०३. | मानवता समृध्द करणाऱ्या वैचारिक साहित्यातील राजा माणूस | प्रा. डॉ. शमसुद्दिन तांबोळी (पुणे) .............. | ०७ |
| ०४. | प्रा. राजा दीक्षित यांचे साहित्य | प्रा. डॉ. जास्वंदी वांबूरकर (मुंबई) ........... | १० |
| ०५. | 'अभ्यासोनि प्रकटणारे' विचारवंत : डॉ. राजा दीक्षित | शिरीष चिटणीस (सातारा) .................... | १७ |
| ०६. | एका कवीचे आत्मिक चरित्र | धनंजय तडवळकर (पुणे ) .................... | २१ |
| ०७. | प्रा. राजा दीक्षित : मानवतावादी साहित्य संशोधक' | शशिकांत हिंगोणेकर (जळगांव) .............. | २५ |
| ०८. | साहित्याचा इतिहासाशी अनुबंध जोडणारा लेखक | प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात (वाई) ........ | २९ |
| ०९. | एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र : मराठीतील विज्ञानविषयक लेखन | प्रा. डॉ. रवींद्र रामचंद्र शिंदे (पुणे) .............. | ३३ |
| १०. | 'राजा' नावाचा माणूस | प्रा. डॉ. धनंजय बाबुराव लोखंडे (पुणे) .......... | ३६ |
| ११. | दीक्षित सर | प्रा. डॉ. श्रध्दा कुंभोजकर (पुणे) .............. | ३८ |
| १२. | डोळस आणि समतोल 'नवप्रबोधक' | प्रा. सरोजकुमार मिठारी (वाई) ................. | ४२ |
| १३. | डोळस दृष्टी देणारे गुरुवर्य | संदीप भानुदास तापकीर (पुणे) ................ | ४४ |
| १४. | भला माणूस | स्वाती राजे (पुणे) ................................ | ४८ |
| १५. | माणसं घडवणाऱ्या शिल्पकाराविषयी... | प्रा. डॉ. सतीश शिरसाठ (पुणे) .............. | ५१ |
| १६. | जीवनाचे शिल्पकार श्री. म. तथा डॉ. राजा दीक्षित | प्रा. डॉ. लहू गायकवाड (नारायणगाव) ......... | ५३ |
| १७. | सहृदयी, आदर्श, तत्त्वज्ञ व मार्गदर्शक गुरुवर्य | सौ. पल्लवी मिरजकर/लोंढे (तासगाव) .......... | ५८ |
| १८. | माझे मार्गदर्शक डॉ. राजा दीक्षित माझे प्रेरणास्थान | प्रा. डॉ. सीमा सागर काळभोर (पुणे) ............ | ६४ |
| १९. | एकोणीसाव्या शतकातील मध्यमवर्गाचे धुरीणत्व | प्रा. डॉ. रूपाली शिंदे (पुणे) .................... | ६६ |
| २०. | आमचे बाबा | निखिल व चिरंतना दीक्षित (पुणे) .............. | ६९ |
| २१. | परिचय | प्रा. डॉ. राजा दीक्षित .......................... | ८४ |
| २२. | अभिप्राय | प्रा. डॉ. अनंत दा. राऊत, गिरीश गांधी, डॉ. रंजन गर्गे, शिवाजी राऊत, प्रा. शिवाजी एंडाईत, प्रा. डॉ. फुला बागुल, प्रा. डॉ. मिलिंद कसबे, प्रा. डॉ. भाऊसाहेब गमे...................................... | ८८ |


मुखपृष्ठावर कवी केशवसुत यांच्या 'नवा शिपाई' या ८ मार्च १८९८ मध्ये लिहिलेल्या कवितेच्या काही ओळी दिल्या आहेत,त्या डॉ राजा दीक्षित यांच्या हस्ताक्षरातील आहेत. (संपादक)




Scanned with OKEN Scanner

# साहित्याचा इतिहासाशी अनुबंध जोडणारा लेखक : डॉ. राजा दीक्षित



**प्रा.डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात**
सहयोगी प्राध्यापक
मराठी विभाग
किसन वीर महाविद्यालय, वाई,
पिन : ४१२८०३
दूरभाष : ९६०४०४६०८४
sangramthorat750@gmail.com




**पुस्तकाचे नाव : 'इतिहास, समाजविचार आणि केशवसुत'**
**लेखक : डॉ. राजा दीक्षित**
प्रकाशक : लोकवाङ्मय गृह, मुंबई ४०००२५ (१९९३; दु. आ. २००५)
पृष्ठे : ८६ मूल्य : ५०/-

प्रस्तावना : डॉ. राजा दीक्षित हे नाव इतिहास शास्त्राशी घट्ट जोडलेले आहे. त्यांनी आपल्या लेखणीतून इतिहास, साहित्य व समाज यांचा अनुबंध जोडण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. 'साहित्य हा समाजाचा आरसा आहे' या प्रसिद्ध वचनाचा आधार घेतल्यास, त्या आरशातून इतिहासाकडे डोकावून पाहता येते. इतिहासाकडे पाहताना साहित्याचा आणि समाजाचा उलगडा होतो. डॉ दीक्षित यांच्या 'इतिहास, समाजविचार आणि केशवसुत' या ग्रंथातून त्यांनी केशवसुतांच्या काव्यातील समाजविचार ऐतिहासिक पध्दतीने शोधला आहे. आंतरविद्याशाखीय अभ्यासपध्दतीच्या माध्यमातून या ग्रंथाकडे पाहता येते. ही ज्ञानशाखा आता जरी नावारूपाला आली असली तरी, डॉ दीक्षित यांनी एम.फिल. करताना ही नवी वाट चोखाळून या अभ्यासपध्दतीचा अवलंब केला आहे. हा सारा पट मांडताना त्यांनी, 'साहित्याच्या समाजशास्त्राच्या दृष्टीने मर्ढेकर, कुसुमाग्रज, करंदीकर, मुक्तिबोध, सुर्वे, ढसाळ अशांच्या कवितेचीसुद्धा सामाजिक अर्थवत्ता मांडण्याची आवश्यकता आहे.' (पृ.२) असे मत मांडून, इतिहास आणि मराठीच्या अभ्यासकांना संशोधनाचा नवा मार्ग दाखविला आहे.

**डॉ. राजा दीक्षित : परिचय**

इतिहासाचे ख्यातनाम प्राध्यापक श्रीधर मधुकर दीक्षित तथा राजा दीक्षित हे नाव आता इतिहासाच्या अभ्यासकांना सुपरिचित झाले आहे. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष व प्रमुख संपादक म्हणून काम केलेल्या दीक्षित सरांचा जन्म पुणे येथे १९५५ मध्ये झाला. त्यांनी इतिहास विषयातून एम.ए., डी.एच.इ., एम. फिल., पीएच.डी. या पदव्या प्राप्त केल्या आहेत. डॉ. दीक्षित हे भारतीय इतिहास अनुसंधानपरिषद, नवी दिल्ली, भारतीय शिक्षण संस्था, पुणे, लोकमान्य टिळक चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई या संस्थांचे सदस्य आहेत, तर त्यांनी वाईच्या प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या नवभारत या वैचारिक मासिकाचे संपादक म्हणून काम केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अमेरिकेतील 'असोसिएटेड कॉलेजेस ऑफ मिड-वेस्ट' या संस्थेच्या'इंडिया प्रोग्राम' अंतर्गत पाच विद्यार्थ्यांनी संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत, तर महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळासाठी संशोधन मार्गदर्शक म्हणून काम करताना त्यांच्या मार्गदर्शनाखाली तीन संशोधक प्राध्यापकांनी प्रकल्प पूर्ण केले आहेत. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून त्यांच्या २४ विध्यार्थ्यांना एम. फिल. तर १० विध्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी मिळाली आहे. त्यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांतून सहभाग नोंदविला आहे. त्यांचे अनेक ग्रंथ प्रकाशित झालेले असून, त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित केले गेले आहे. देश व राज्य शासनाच्या अनेक समित्यांचे ते सदस्य आहेत. डॉ. दीक्षित हे इंडियन हिस्ट्री काँग्रेस, नवी दिल्ली, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, पुणे विद्यापीठ इतिहास परिषद, पुणे, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, पुणे, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई या संस्थांचे आजीव सदस्य आहेत. तसेच अनेक कार्यक्रमांचे सूत्रसंचालन. महाराष्ट्रातील विविध इतिहास परिषदांचे अध्यक्षपद व विभागीय अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. अनेक साहित्य-संमेलने, कविसंमेलने, व्याख्यानमाला,

चर्चासत्रे, आकाशवाणी व दूरदर्शन कार्यक्रम, शैक्षणिक ध्वनी-चित्रफिती आणि विविध सामाजिक उपक्रम यांमध्ये ते सहभागी झाले आहेत.

**इतिहास, समाजविचार आणि केशवसुत :-**

हा ग्रंथ शीर्षकाप्रमाणेच तीन भागांमध्ये विभागला आहे. ग्रंथ छोटेखानी असला तरी, तो अभ्यासकांच्यात साहित्याकडे बघण्याचा सामाजिक व ऐतिहासिक दृष्टीकोन निर्माण करतो. याविषयीची भूमिका मांडताना डॉ. राजा दीक्षित म्हणतात, 'इतिहासाच्या अभ्यासात समाजविचाराची दखल घेण्यासाठी लिहिलेल्या या प्रबंधात कवी केशवसुतांचा विचार ठळकपणे केलेला आहे. याचे प्रयोजन काय? इतिहासाच्या अभ्यासात साहित्याचा विचार कशासाठी? समाजाशी व समाजविचाराशी साहित्याचे नाते तरी कोणते? असे प्रश्न उपस्थित होऊ शकतील. या प्रश्नांची तात्त्विक चर्चा केली तर तिच्या विचारसूत्रातून पुढील विवेचनाची दिशा स्पष्ट होऊ शकेल.' (पृ.२) असे प्रश्न सुरुवातीलाच मांडून लेखकाने आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

'इतिहास, साहित्य आणि समाज' या पहिल्या प्रकरणात लेखकाने केशवसुतांच्या 'नैऋत्येकडील वारा' या कवितेतील 'ये येथे इतिहासपत्र पडकें वाचूनि पाही जरा!' या काव्यपंक्तींचा दाखला देऊन, त्यांच्या काव्यात इतिहास, साहित्य आणि समाज यांच्या सहसंबंधांचा दुवा शोधला आहे. ही कविता लिहिली त्यावेळी कवी खानदेशात होते. खानदेशाच्या नैऋत्येस कवीची जन्मभूमी असल्याने, तिकडून येणाऱ्या वाऱ्यास उद्देशून त्यांनी कविता लिहिली आहे. साहित्य आणि समाज जसे एकमेकांपासून वेगळे करता येत नाहीत, तसेच इतिहास या सर्व गोष्टींचा साक्षीदार असल्याने इतिहासाचीही दखल घ्यावी लागते. कारण 'सर्व इतिहास हा विचाराचा इतिहास आहे.' असे कॉलिंगवूडने म्हटले आहे. विचारांची पेरणी समाजाच्या साक्षीने साहित्यातून झालेली असते. त्यामुळे समाजविचार करताना सामाजिक गट, संघटन, संबंध आणि बदल या घटकांचा विचार करावा लागतो. या तिन्हींच्या सहसंबंधांबद्धल डॉ. राजा दीक्षित म्हणतात, 'इतिहास व साहित्य यांच्या संबंधात एक नवा दृष्टिकोन विकसित झाला आहे. तो म्हणजे इतिहासशास्त्राला कलासुद्धा मानण्याचा दृष्टिकोण, साहित्यलेखन व इतिहासलेखनाच्या प्रक्रियांमधील साम्य शोधण्याचा दृष्टिकोन. इतिहासलेखनात संपूर्ण वस्तुनिष्ठता शक्य नाही. इतिहासकारही कलावंताप्रमाणे प्रतिभाशाली असावा लागतो. इतिहास ही घटनांची जंत्री नसून मुख्यतः तो अन्वयार्थ असतो. अन्वयार्थ लावण्यासाठी प्रतिभा हवी.' (पृ.६) म्हणजे एकीकडे इतिहासाला कला मानले जाऊ लागले आहे, आणि प्रतिभाशक्ती ही जरी साहित्यिकासाठी देण असली तरी, आता इतिहासकारालाही प्रतिभावंत असणे अनिवार्य झाले आहे. या तिन्हींना एकत्र बांधण्याचे काम भाषा करत असते. भाषा ही समाजाची, इतिहासाची तसेच साहित्यिकाचीही असते. त्यामुळेच साहित्यिकाची निर्मिती कालांतराने समाजाची होते. वाचक हाच त्याचा खरा उपभोक्ता असतो. आणि वाचक हा समाजाचा घटक असतो. 'कवीने अगदी 'झपूर्झा' सारखा एखादा नवीन शब्द निर्माण केला, तरी त्याने लिहिल्या क्षणापासून तो शब्द समाजाचा बनतो. ती कवीची खाजगी मालमत्ता रहात नाही. समाजाच्या खुल्या शब्दभांडारात तो शब्द जमा होतो. भाषेचा मूळ हेतूच मुळी संवाद साधण्याचा असतो आणि जेथे संवाद आला तेथे ओघाने सामाजिकता आलीच.' (पृ.८)तर दि. के. बेडेकर म्हणतात, 'झपूर्झा' सारखा एक नवाच शब्द एका नादनृत्यमय मग्नतेत त्यांनी घडविला, यावरून एक दिसते की शब्दांच्या बाबतीत त्यांचे कविमन फार सूक्ष्म व निर्मितिक्षम होते. 'मठ्ठ ' हा साधा शब्द ते घेतात व कवितेत अशा त-हेने वापरतात की त्या शब्दाच्या अर्थसंदिग्धतेतून त्या विशिष्ट संदर्भात काव्यमय आशय निर्माण होतो.'(केशवसुतांची काव्यदृष्टी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई पृ.२) येथे दोन्ही समीक्षकांनी घेतलेला 'झपूर्झा' हा शब्द केशवसुतांच्या एका गाजलेल्या कवितेचे शीर्षक आहे. केशवसुतांनी हा नवीन शब्द मराठीत रूढ केला. माहेरवाशीण मुलीची सासरी रवानगी करताना, 'जा पोरी जा' असे दुःखाभिवेगाने पाठवणीच्या स्वरामध्ये म्हणताना, ज्यावेळी वारंवार म्हटले जाते तेव्हा झपूर्झा-झपूर्झा असा ध्वनी निघतो. झपूर्झा हा शब्द प्रथम साहित्यात आला व कालांतराने तो कवीचा न रहाता समाजमनाचा झाला व पुढे तो इतिहासात समाविष्ट झाला.

केशवसुतांच्या काव्यातील 'नव्या मनूंतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे', 'जुने जाऊ द्या मरणालागुनी' (नवा शिपाई) 'एक तुतारी द्या मज आणुनी', (तुतारी) 'कठीण शब्द या धोंड्यांनी करितो हाणाहाण' (गोफण केली छान!) अशा अनेक काव्यपंक्ती आता आपण सुभाषित स्वरुपात वापरताना दिसतो. पुढच्या पिढीला तर कालांतराने या केशवसुतांच्या काव्यपंक्ती आहेत हे आवर्जून सांगावे लागेल एवढ्या त्या रूढ होऊन समाजाच्या होऊन जातील



Scanned with OKEN Scanner

व इतिहास त्याचा साक्षीदार असेल. डॉ. दीक्षित म्हणतातच, 'इतिहासाच्या अभ्यासात साहित्य महत्त्वाचे ठरते, ते साहित्य आणि समाज यांच्या सहसंबंधांमुळे.' (पृ.७) या प्रकरणात हा संबंध लेखकाने अधोरेखित केला आहे. व.दि.कुलकर्णी म्हणतात, 'केशवसुतांची कविता ही हरपल्या श्रेयाच्या शोधात, झपूर्झा घालीत, रानावनात, दूर विजनात, हिंडणारी कविता आहे. 'माणूस' तिला आवडतो; 'माणसे' मात्र बिलकूल आवडत नाहीत. केशवसुत या पृथ्वीवर जिवाहून जास्त माया करतात; ती सुंदर आणि श्रीमंत व्हावी, ह्याचा त्यांना ध्यासच आहे. त्यांच्या मनातला महामानव-महाकवी-ह्या गरीब पृथ्वीला तिचे मूळ लावण्य, तिचे मूळ तेज, तिचे वैभव, तिचे सौभाग्य प्राप्त करून देईल, अशी प्रबळ आशा केशवसुत मनी बाळगून असल्याचे दिसते.' (केशवसुतांचे अंतरंग, नितीन प्रकाशन, पुणे, पृ.६.)

'महाराष्ट्रातील सामाजिक वास्तव आणि समाजविचार' या दुसऱ्या प्रकरणात लेखकाने मराठी संतांच्या आध्यात्मिक विचरांपासून सुरुवात केली आहे. 'महाराष्ट्राच्या ऐतिहासिक परंपरेला आकार देणारा एक घटक म्हणजे संतांची भक्तीमार्गी चळवळ.' असे लेखकाला वाटते. तर व.दि.कुलकर्णी म्हणतात, 'महाराष्ट्रात प्रबोधनाचा उत्कर्षकाळ होता, त्या वेळी केशवसुत काव्य करू लागले, व या प्रबोधनामध्ये पूर्वदिव्याचे स्मरण, गौरव व अनुकरण हा भाग होता. त्यामुळे 'हृदयस्थ प्रकाशाचे' तत्त्व केशवसुतांनी आपल्या तत्त्वज्ञानातून घेतले असावे.' (केशवसुतांचे अंतरंग, नितीन प्रकाशन, पुणे, पृ. १८) शिवछत्रपतींच्या कार्याचा गौरव करताना डॉ. दीक्षित म्हणतात, 'महाराष्ट्राच्या ऐतिहासिक परंपरेला आकार देणारी विशेष महत्त्वाची शक्ती म्हणजे छत्रपती शिवाजी. शिवाजीची स्वराज्यस्थापना आणि मराठ्यांमध्ये त्यांनी केलेली स्वत्त्वजागृती लक्षात घेता असे म्हणता येईल की, मध्ययुगीन चौकटीतील एक राष्ट्र-राज्य शिवाजी महाराजांनी उभारले. मराठ्यांचा मध्ययुगीन राष्ट्रवाद आणि छत्रपतींचे धर्मसहिष्णू व लोकहितकारी धोरण म्हणजे त्या काळाच्या संदर्भातील प्रागतिक स्थितिबदल होता. या स्थितिबदलातूनच मराठ्यांच्या सत्तेचा भावी विस्तार शक्य झाला. मराठी सत्तेच्या विस्तारवादाच्या कालखंडात परिवर्तनाच्या सुप्त शक्ती रुजलेल्या होत्या. त्यांचा विचार केल्याशिवाय १९ व्या शतकातील सामाजिक वास्तवाचे पुरेसे आकलन होऊ शकणार नाही.' (पृ.२१) १९ व्या शतकातील समाजविचार मांडताना लेखकाने महात्मा फुले यांचा सत्यशोधकीय विचार, रानडे, टिळक, आगरकर यांचा समाजविचार, प्रार्थना समाज,विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमाला, आंबेडकरी चळवळ, पेशवाईचा अस्त, निव्वळ इंग्रजी काळ, मराठी कादंबरी लेखन, वृत्तपत्रांचा उदय, १८५७ चा उठाव, शाहिरी वाङ्मयाचा उदय, धर्मसुधारणावादी विचार, ब्राह्मणेतर चळवळी, स्त्रियांविषयक विचार अशा अनेक प्रवाहांचा विचार मांडून सामाजिक जडणघडणीचा दीर्घ पट मांडला आहे. या विचारप्रवाहातूनच पुढे महाराष्ट्रात समाजसुधारकांचा इतिहास निर्माण झाला. वृत्तपत्रे, कथा, कादंबरी, नाटक यांमधूनही हे विचार प्रतिबिंबित होऊ लागले. प्रबोधनाच्या इतिहासाचा आढावा घेत, समाजविचार मांडताना लेखकाला साहित्याचीही दखल घ्यावी वाटते. हा समाजविचार मांडताना डॉ. दीक्षित यांनी काही प्रश्नही निर्माण केले आहेत. '१९ व्या शतकाअखेरच्या महाराष्ट्रातील सामाजिक वास्तव आणि समाजविचाराची जी चर्चा आतापर्यंत केली, तिचे तत्कालीन साहित्याशी असणारे नाते कोणते? तत्कालीन सुधारणावाद व परंपराप्रीयता, किंबहुना तत्कालीन समाजाचे अंतःसत्त्व साहित्यामध्ये प्रतिबिंबित झाले आहे का? या अंतःसत्त्वाच्या घडणीत साहित्याचा काही वाटा होता का? अशा काही प्रश्नांचा शोध घेणे ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे. हा शोध घेण्यासाठी काही स्वतंत्र प्रबंध होऊ शकतील. पुढच्या प्रकरणात असा शोध अगदी छोट्या प्रमाणात आणि कवी केशवसुतांच्या विशेष संदर्भात घेतलेला आहे.' (पृ.४०) या प्रकरणातून काही प्रश्न मांडून डॉ. दीक्षित यांनी इतिहास आणि मराठीच्या अभ्यासकांना संशोधनाचा नवा मार्ग दाखविला आहे. तसेच पुढील प्रकरणाच्या मांडणीचे सूतोवाचही केले आहे.

'समाजविचार आणि केशवसुत' या तिसऱ्या प्रकरणात लेखकाने इतिहासाचा साहित्याशी व समाजाशी अनुबंध जोडला आहे. तो जोडताना त्यांनी 'प्रस्तुत प्रबंधात केशवसुतांच्या कवितेचा रसग्रहणात्मक वा वाङ्मय-समीक्षात्मक विचार करणे अभिप्रेत नाही; तर ऐतिहासिक संदर्भात तिचा विचार करणे आणि साहित्याची सामाजिक अर्थवत्ता शोधणे अभिप्रेत आहे.' (पृ.५७) अशी स्पष्ट भूमिका माडली आहे. केशवसुतांच्या कवितेतील निसर्ग, प्रेम, सामाजिक, राष्ट्रीय अशा जाणिवांचा त्यांनी परामर्श घेतला आहे. सदर कवितेकडे ऐतिहासिक दृष्टीने पाहताना



Scanned with OKEN Scanner

लेखकाला केशवसुतांच्या प्रेम कवितेत तत्त्वज्ञान, निसर्ग कवितेत पाश्च्यात्य निसर्गवाद, सामाजिक कवितेतून सुधारणावाद दिसतो 'या कवितांमधून केशवसुतांचा सुधारणावाद प्रत्ययास येतो. कवीच्या श्रेष्ठत्वाविषयीच्या विलक्षण आत्मविश्वासामुळे हा सुधारणावाद केशवसुत जोमदारपणे मांडू शकले. ज्या स्वातंत्र्यतत्त्वाचा उद्घोष त्यांनी आपल्या कवितांमधून केला, ते स्वातंत्र्य मुळात कवीला असले पाहिजे, असे त्यांना वाटणे स्वाभाविक होते. त्यामुळे 'कविता अशी असावी किंवा तशी नसावी, हे कवीला सांगणारे तुम्ही कोण?' असा रोकडा सवाल आपल्या काव्यलेखनाच्या आरंभकाळातच विचारून त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, 'कवीच्या वाटेला जाऊ नका, त्याला कवितेबरोबर राहू द्या' (पृ.६१)असा हा परखड विचारांचा कवी होता. कवींविषयी असे ठणकावून बोलणाऱ्या या कवीने 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' (१८८८) समाजासमोर मांडला. त्यांच्या कवितेपासूनच मराठी कवितेने नवे वळण घेतले. त्यांची प्रत्येक कविता समाजाचा हुंकार होती.

केशवसुतांच्या कवितेतून राष्ट्रीय जाणिवही प्रकर्षाने प्रकटताना दिसून येते. त्यांच्या या कविता त्यासंदर्भात उदाहरणादाखल घेता येतील, 'गावी गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून' 'गोष्टी घराकडिल मी वदता गड्या रे', 'जयाजीराव शिंदे व तुकोजीराव होळकर', 'रा. रा. बळवंत आपाजी दाते यांस', 'दोन बाजी', 'निषाणाची प्रशंसा', 'कवितेचे प्रयोजन' या साऱ्या कविता इतिहासासी संबंधित आहेत. कवितांमधूनही केशवसुतांची राष्ट्रीय जाणीव व्यक्त होते. डॉ. दीक्षित म्हणतात, 'राष्ट्रीयतेच्या संदर्भात आणखी एक मुद्दा लक्षात घेतला पाहिजे. स्वातंत्र्याचा उद्‌घोष करणे हेच केवळ राष्ट्रीय जाणीवेचे लक्षण मानण्याचे कारण नाही. समाजसुधारणेचा विचार हासुद्धा राष्ट्रीय जाणीवेचा भाग होता. समाजसुधारक हे काही राष्ट्रविरोधी किंवा स्वातंत्र्यशत्रू नव्हते. त्यांच्या जाणीवा आणि कार्य निश्चितपणे राष्ट्रोद्धाराच्या जाणीवेचा भाग होते. या दृष्टीने केशवसुतांची सामाजिक कवितासुद्धा राष्ट्रीय म्हणता येईल.' (पृ.६७)या मताचा विचार केल्यास साहित्य हे समाज, इतिहास व राष्ट्र यांच्याशीही जोडले गेले आहे. जुने मराठी किल्ले केशवसुतांना 'पडके इतिहासपत्र' वाचण्याचे आवाहन करतात. कथा, कादंबरी, काव्य, चरित्र, आत्मचरित्रे अशा अनेक वाङ्मय प्रकारांतून सामाजिक इतिहासाचा तपशील त्याची विविधांगी माहिती मिळते. कारण सामाजिक घटिते साहित्यात सत्य स्वरूपात परिवर्तीत होत असतात. अनुभव रूपात त्याची मांडणी वाङ्मयात होताना दिसते. उदा - केशवसुताच्या 'तुतारी' या कवितेतून समाज जीवनाच्या अंतरंगातील स्थितीगतीचे अभिज्ञान होते.

**निष्कर्ष :-**

१. डॉ. राजा दीक्षित यांच्या सदर ग्रंथामुळे एक नवी ज्ञानशाखा अभ्यासकांसाठी खुली झाली.

२. इतिहास, साहित्य व समाज यांचा अनुबंध जोडला गेला.

३. केशवसुतांच्या कवितेची ओळख अभ्यासकांना नव्या पद्धतीने झाली.

४. इतिहासाकडे कलात्मक दृष्टीने व साहित्याकडे समाजिक दृष्टीने पाहण्याची संधी प्राप्त झाली.

५. इतिहास, साहित्य व समाज यांच्यातील सामिप्य दृढ झाले.

**समारोप :-**

अशाप्रकारे डॉ. राजा दीक्षित यांनी केशवसुतांच्या कवितेतून प्रतीत होणारा इतिहास व समाज यांची मांडणी सार्थपणे केली आहे.त्यांच्या कवितेतून व्यक्त होणारा समाजविचार पुढीलांना दिशादर्शक ठरला. मराठी कवितेतही पुढे अमुलाग्र बदल झाला. केशवसुतांना 'युगप्रवर्तक कवी', 'आधुनिक मराठी कवितेचे जनक','कवींचा कवी,' 'युगमानसाचे कवी' अशा अनेक उपाध्याही मिळाल्या, पण त्यांच्या हयातीत त्यांना नावलौकिक मिळाला नव्हता, ही मात्र मराठी मनात खंत आहे. डॉ. दीक्षित ग्रंथाचा शेवट करताना म्हणतात, 'इतिहासाची संकल्पना आता आमुलाग्र बदलली आहे. इतिहास, साहित्य आणि समाज यांच्या परस्परसंबंधांच्या आकलनातून इतिहासाच्या अभ्यासाला नवे परिमाण प्राप्त होत आहे. केशवसुतांची कविता म्हणजे एक 'इतिहासपत्र 'सुद्धा कसे आहे, याचे कोडे या आकलनामुळे अगदी सहज उकलू शकते !' (पृ.७५) ■

* संदर्भ : १. 'इतिहास, समाजविचार आणि केशवसुत', लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९९३. २. 'केशवसुतांचे अंतरंग', नितीन प्रकाशन, पुणे. ३. केशवसुतांची काव्यदृष्टी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.



Scanned with OKEN Scanner

SDM/PUNE/SR/61/6/4/2013 RNI Reg. No. MAHMAR/2013/52565


सुवर्णमहोत्सवी वर्ष

# इतिहास शिक्षक महामंडळ, महाराष्ट्र

(रजि. नं. एम. ए. एफ. ९८३, दिनांक १८ नोव्हेंबर १९७४)

ब-२ सम्राट को-ऑप. हौसिंग सोसायटी, राजारामपुरी ८वी गल्ली (टाकाळा), कोल्हापूर - ४१६००८.

- महाराष्ट्रातील इतिहास-शिक्षण क्षेत्रात गेली ५१ वर्षे कार्य
- याबाबत सातत्याने कार्य - इतिहास अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, शिक्षक-हस्तपुस्तिका, शिक्षक-प्रशिक्षण व प्रबोधन, शिबिरे, राज्यस्तरीय संमेलने, विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम
- महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांमध्ये कार्यविस्तार
- भारतीय राज्यघटनेतील मूल्ये आणि शैक्षणिक धोरणातील गाभातत्त्वे यांनुसार कार्य
- डॉ. अ. रा. कुलकर्णी पुरस्कार - शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा
- डॉ. अरविंद देशपांडे पुरस्कार - शिक्षकांसाठी राज्यस्तरीय इतिहास प्रकल्प आणि शोधनिबंध स्पर्धा
- गुरुवर्य श्री. म. कृ. केरुळकर पुरस्कार - राज्यस्तरीय आदर्श शिक्षकांसाठी
- डॉ. सुमन वैद्य पुरस्कार - राज्यस्तरीय आदर्श शिक्षिकांसाठी
- प्रा. ज. वि. नाईक पुरस्कृत न्या. म. गो. रानडे व्याख्यानमाला
- इ. ५ वी ते १२ वी विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा
- इ. ५ वी ते १0वी विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय इतिहास प्रज्ञाशोध परीक्षा
- विशेष प्रकाशने - प्रा. अ. रा. कुलकर्णी गौरविका, प्रा. डॉ. अरविंद देशपांडे गौरव अंक, प्रा. डॉ. अरविंद देशपांडे गौरव ग्रंथ (इंग्रजी), गुरुवर्य म. कृ. केरुळकर गौरव अंक, प्रा. डॉ. राजा दीक्षित गौरव विशेषांक.

**महामंडळाची कार्यकारिणी**

अध्यक्ष - कै. श्री. मनोहर कृष्णाजी केरुळकर
कार्याध्यक्ष - श्री. बापूसाहेब दत्ताजीराव शिंदे
सदस्य - श्री. विजयचंद्र दत्तात्रय थत्ते, श्री. प्रमोद बसप्पा हिंगमिरे, श्री. सतीश मुरलीधर इनामदार, श्री. कांतीलाल बाबालाल परदेशी, कु. आसावरी दंडवते, श्री. अर्जुन लक्ष्मण खोत

**इतिहास शिक्षक त्रैमासिक - संपादक मंडळ**

संपादकीय सल्लागार - प्रा. डॉ. राजा दीक्षित
कार्यकारी संपादक - श्री. कां. बा. परदेशी
सदस्य- प्रा. डॉ. शिवानी लिमये, श्री. संजय वझरेकर, श्री. प्रमोद बसप्पा हिंगमिरे, कु. आसावरी दंडवते, श्री. सतीश इनामदार, श्री. अर्जुन खोत, श्री. योगेश पाटील, श्री. नारायण के. पवार

**आमचे चार दशकांहून अधिक काळचे मार्गदर्शक व सल्लागार डॉ. राजा दीक्षित यांच्यावरील 'सक्षम समीक्षा'च्या साहित्य विशेषांकास आमच्या हार्दिक शुभेच्छा!**


सक्षम समीक्षा हे त्रैमासिक मालक, मुद्रक वा प्रकाशक सौ. सुनिता शैलेश त्रिभुवन यांनी गणेश ग्राफीक्स, स. न. १२०/४०, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे ४११ ०३०. येथे छापून शब्दाली प्रकाशन, बी-५/२०६, दुसरा मजला, राहुलनिसर्ग, अतुलनगर, वारजे, पुणे - ४११ ०५८. येथे प्रसिध्द केले. - संपादक : डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन

Scanned with OKEN Scanner